नि.फौ.ख. क्रमांक.३८६/२०२२
सरकार विरुध्द किशोर
निशाणी क्रमांक– ४४

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – हणुमंत सदाशिव घुले,
वय -४१ वर्षे, धंदा - शेती,
रा. हिंगणगाव, ता. अहमदपूर, जि.लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.शिंदे</u>**

**०१.** घटना दिनांक २३/०२/२०२१ रोजी सायकांळी ८.०० वाजता माझे किराणा दुकानासमोर झाली होती. त्यादिवशी आरोपी किशोर माझेकडे उधारीवर सामान मागत होता. मी त्याला माझे तुझ्याकडे पुर्वीचीच रक्कम रुपये दोन हजारची उधारी आहे, ती रक्कम दिल्यानंतर सामान मिळेल. त्यामुळे, आरोपी रागाने दुकानातून निघून गेला. त्यानंतर मी ८.३० चे दरम्यान दुकान बंद करीत असताना आरोपी किशोर हातात कत्ती घेवून आला. त्याचे पाठोपाठ त्याचे वडील सायस फड हातात कुऱ्हाड घेवून आले. आरोपी सायस फड याचेसोबत त्याची पत्नी आरोपी अंजना ही आली होती. आरोपी सायस फड याने मला उधार का देत नाही असे विचारले. मी त्यांना माझे तुमचे मुलाकडे पुर्वीचीच उधारी आहे, त्यामुळे उधार देत नाही. याचा आरोपी सायस फड याला राग आला, त्याने माझे डोक्यात कुऱ्हाडीचे तुंब्याने मारले. आरोपी किशोर याने कत्तीने माझे डोक्यावर व पोटाचे डाव्या साईडला मारले. आरोपी अंजना हिनेही मला लाथा-बुक्क्यांनी मारले. आरोपींनी मला जिवे मारण्याची धमकी दिली. गावातील एकनाथ ज्ञानोबा फड, विष्णु विठ्ठल घुले व ज्ञानोबा यशवंत दराडे यांनी किनगांव येथील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. तेथील डॉक्टरांनी मला प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी अंबेजोगाई येथील सरकारी दवाखान्यात पाठवले. त्याठिकाणी मी सात दिवस उपचार घेतले. मला सरकारी दवाखान्यातून दि.०१/०३/२०२१ रोजी सोडण्यात आले. त्यानंतर मी घरी दोन दिवस आराम केला. त्यानंतर मी किनगांव पोलीस ठाणे येथे घटनेबाबत फिर्याद नोंदवली. आता मला फिर्याद दाखवली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. फिर्यादीला **<u>नि.क्र.४५</u>** देण्यात येते. मला ज्या कुऱ्हाडीने व कत्तीने मारहाण करण्यात आली, ती दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला कुऱ्हाड व कत्ती दाखवली, याच कुऱ्हाडीच्या तुंब्याने व कत्तीने मला मारण्यात आले होते. कुऱ्हाड व कत्ती

यांना अनुक्रमे **<u>वस्तु क्र.अ व वस्तु क्र.ब</u>** असे संबोधण्यात येते. आरोपी न्यायालयात हजर आहेत, त्यांना मी ओळखतो.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.डी.एम.कांबळे यांच्यामार्फत सुरु:-</u>**

**०२.** मी फिर्यादीतील मजकुर हस्ताक्षरात लिहिला होता, त्यानंतर तो माझेसमक्ष टंकलिखीत करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, मी किराणा दुकान संध्याकाळी ८.०० वाजता बंद करतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी कायमस्वरुपी पुणे येथे राहतात. आरोपी लॉकडाऊन असल्यामुळे त्या काळात गावी हिंगणगाव येथे आल्याचे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या काळात लॉकडाऊन असल्याने किराणा दुकान बंद होते. आरोपीने घटनेच्या दिवशी किराणा मालाची मागणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीने नेमका कोणता किराणा माल मागितला हे फिर्याद देताना सांगितले नव्हते. आरोपीची उधारी बाकी असल्याबाबत मी रजिस्टर ठेवलेले होते. ते मी पुढील तारखेस दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, माझे किराणा दुकान मंदिराचे पाठीमागे आहे. त्याठिकाणी लोकवस्ती असल्याने लोकांची वर्दळ असते. घटनेच्या वेळी लोक जमा झाले होते, त्यांनी सोडवा सोडव केली. ज्ञानोबा यशवंत दराडे माझे मामा आहेत. हे म्हणणे खरे आहे की, एकनाथ ज्ञानोबा फड व विष्णु विठ्ठल घुले हे गावातील रहिवाशी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, एकनाथ फड व विष्णु घुले माझे किराणा दुकानाचे गिऱ्हाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीतील मजकुर पोलिसांच्या सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, एकनाथ फड व विष्णु घुले माझे गिऱ्हाईक असल्याने व ज्ञानोबा दराडे माझे मामा असल्याने ते घटनेच्या वेळी हजर नसताना ते हजर असल्याचे मी सांगत आहे.

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपी किशोर फड रागाने गेला, त्यानंतर पुन्हा येवून त्याने मला कत्तीने व आरोपी सायस याने कुऱ्हाडीने मारल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी अंजना हिने लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणतीही मारहाण केली नसताना पुर्वीचे भांडणाचा राग मनात ठेवून आरोपींविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी यापुर्वी ही रवी फड, जगन्नाथ फड, किशोर घुले व मधुकर घुले यांच्यासोबत किराणा दुकानाचे उधारीवरुन

दारु पिवून भांडण केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला दारुचे व्यसण असून मी दारु पिवून भांडणे करत असतो. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

**फेर तपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

**( आर.डी. वाबळे )**

दिनांक -१८/०४/२०२६

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.